पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.विधी समिति

कार्यपत्रिका क्रमांक ६

**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक - १६/०८/२०१३ वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक १६/०८/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. जवळकर वैशाली राहुल - सभापती
२) मा. मोटे किरण बाळासाहेब
३) मा. काळभोर वैशाली जालिंदर
४) मा. जाधव साधना रामदास
५) मा. शितोळे शैलजा बाबुराव
६) मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव
७) मा. बारणे निलेश हिरामण

याशिवाय मा.टेकाळे – सहा.आयुक्त, मा.गावडे – नगरसचिव, मा.कुलकर्णी, मा.शरद जाधव – कार्य.अभियंता, मा.चव्हाण – आरोग्य कार्यकारी अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला.

विषय क्र.११) पिंपळे सौदागर ते पिंपळे गुरव हद्दीतील गुरुत्व नलिका शिफ्ट करणे..

**खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.निलेश बारणे

पाकिस्तानी सैनिकांच्या भ्याड हल्यात देशाचे संरक्षण करीत असणा-या ५ भारतीय जवानांना अमरत्व प्राप्त झाले. त्यांच्या स्मृतीस श्रध्दांजली अर्पण करुन शुक्रवार दि.२३/०८/२०१३ दुपारी ३.०० पर्यंत सभा तहकूब करावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**सभापती -** शुक्रवार दिनांक २३/०८/२०१३ दुपारी ३.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(जवळकर वैशाली राहुल)
**सभापती**
मा. विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.विधी समिती

कार्यपत्रिका क्रमांक ६

**सभावृत्तांत**

( दि.१६/०८/२०१३ ची तहकूब सभा )

दिनांक - २३/०८/२०१३ वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची दि.१६/०८/२०१३ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक २३/०८/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. जवळकर वैशाली राहुल - सभापती
२) मा. मोटे किरण बाळासाहेब
३) मा. काळभोर वैशाली जालिंदर
४) मा. जाधव साधना रामदास
५) मा. शितोळे शैलजा बाबुराव
६) मा. काळजे नितीन प्रताप
७) मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव
८) मा. बारणे निलेश हिरामण

याशिवाय मा.झुरे – सह आयुक्त, मा.टेकाळे – सहा.आयुक्त, मा.पवार – कार्यालय अधिक्षक, मा.कुलकर्णी – कार्य.अभियंता, मा.चव्हाण – आरोग्य कार्यकारी अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

**खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.नितीन काळजे

जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र दाभोलकर व ज्योतिर्भास्कर जयंत साळगांवकर यांना श्रध्दांजली वाहून शुक्रवार दि.०६/०९/२०१३ दुपारी २.४५ पर्यंत सभा तहकूब करावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**सभापती -** शुक्रवार दिनांक ०६/०९/२०१३ दुपारी २.४५ वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(जवळकर वैशाली राहुल)
**सभापती**
मा. विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
मा.विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक ६

**सभावृत्तांत**

( दि.१६/०८/२०१३ व २३/०८/२०१३ ची तहकूब सभा )

दिनांक - ०६/०९/२०१३ वेळ - दुपारी २.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची दि.२३/०८/२०१३ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक ०६/०९/२०१३ रोजी दुपारी २.४५ वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. जवळकर वैशाली राहुल - सभापती
२) मा. मोटे किरण बाळासाहेब
३) मा. काळभोर वैशाली जालिंदर
४) मा. जाधव साधना रामदास
५) मा. प्रशांत शितोळे
६) मा. शितोळे शैलजा बाबुराव
७) मा. काळजे नितीन प्रताप
८) मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव
९) मा. बारणे निलेश हिरामण

याशिवाय मा.पाटील, मा.तुपे – सह शहर अभियंता, मा.गावडे – नगरसचिव, मा.दुधेकर, मा.बरशेट्टी, मा.शरद जाधव, मा.साळवी, मा.कुलकर्णी, मा.जुंधारे – कार्य.अभियंता, मा.चव्हाण – आरोग्य कार्यकारी अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**दिनांक ०२/०८/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

----------

ठराव क्रमांक :३७ विषय क्रमांक : १
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – प्रशासन
सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/८१२/२०१३, दि.२१/०६/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

डॉ. के.अनिल रॉय, वैद्यकीय अधिकारी यांना र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ७६०० या वेतनश्रेणीमध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता

देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :३८ विषय क्रमांक : २
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – प्रशासन
सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा. निलेश बारणे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/९४१/२०१३, दि.१६/०७/२०१३

विषय - श्री.सतिश कुलकर्णी, मुख्याधिकारी गट-अ यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील मुदतवाढीबाबत.

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक :३९ विषय क्रमांक : ३
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – प्रशासन
सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा.वैशाली काळभोर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/९४२/२०१३, दि.१६/०७/२०१३

विषय - श्री. ज्ञानेश्वर ढेरे, मुख्याधिकारी श्रेणी-१ यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील मुदतवाढीबाबत.

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

क्रमांक : ४० विषय क्रमांक : ४
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – स्थापत्य प्रकल्प
सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.वैशाली काळभोर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्थाप्र/जा/कावि/५२१/२०१३, दि.१९/०७/२०१३

विषय - मुंबई पुणे रस्त्यावर दापोडी ते पिंपरी चौक कर्ब स्टोन, फुटपाथ, रस्ता दुभाजक इ.देखभाल दुरुस्ती करणे या उपलेखाशिर्षाखाली दापोडी ते निगडी मार्गदर्शक फलक बसविणे व दुरुस्ती करणे.

विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :४१ विषय क्रमांक : ५

दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – स्थापत्य बीआरटीएस

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.भाऊसाहेब भोईर

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बीआरटीएस/५५६/२०१३, दि.०२/०८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

औंध-रावेत बी.आर.टी.एस. रस्त्यावरील वाय जंक्शन येथे अंडरपास बांधणेचे कामास व याकामी येणा-या र.रु.१३,४२,२१,६९०/- च्या अंदापजपत्रकीय खर्चास मा.महापालिका सभेची मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :४२ विषय क्रमांक : ६

दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – आरोग्य मुख्यालय

सुचक : मा.निलेश बारणे अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आ.मु.का./३/कावि/५११/२०१३,दि.२०/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस विचारात घेऊन -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील हॉटेल/कॅन्टींन व अन्य खाद्यपदार्थ उत्पादन/विक्री करणा-या व्यवसायांना त्यांचे व्यवसायातून दैनंदिन निर्माण होणारे फुडवेस्ट गोळा करणे व वाहतूक करुन कचरा डेपो येथे विल्हेवाट लावणे कामासाठी सध्या आकारणेत येणा-या शुल्कामध्ये परिशिष्ट “अ” मध्ये नमुद केलेप्रमाणे हॉटेल/कॅन्टीन वेस्ट गोळा करणे सेवेसाठी आकारणेत येणा-या शुल्कामध्ये वाढ करणे तसेच मंगल कार्यालये, मॉल, स्वीट मार्ट, हॉल, सभागृह, बेकरी व्यवसायांना प्रपत्र “ब” प्रमाणे वाढ करणेस तसेच परिशिष्ट “ब” मधील अ.क्र.२ मध्ये मॉलमधील हॉटेलसाठी स्वतंत्रपणे सेवाशुल्क आकारणेस, तसेच परिशिष्ट “ब” मध्ये मॉलची संख्या २ नमुद केली आहे, त्याऐवजी “मनपा कार्यक्षेत्रातील सद्यस्थितीत मॉलची यादी” प्रमाणे एकूण १० मॉल चालू आहेत. तरी विषयपत्रात १० मॉल गृहित धरुन त्यास, त्याचप्रमाणे मनपा क्षेत्रात यापुढे नव्याने चालू होणारे व्यवसायासाठी सदरचे दर लागू करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**परिशिष्ट “ अ ”**

| अ.क्र. | हॉटेलचा दर्जा | हॉटेलची संख्या | सध्याचे सेवाशुल्क (वार्षिक) र.रु. | वाढ केल्यानुसार नविन सेवाशुल्क (वार्षिक दर) र.रु. | मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | “ अ ” | २०६ | ३,०००/- | ८,०००/- | १६,४८,०००/- |
| २ | “ ब ” | १३१ | २,०००/- | ६,०००/- | ७,८६,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | “ क ” | ३८१ | १,०००/- | ४,०००/- | १५,२४,०००/- |
| ४ | “ ड” | ५३९ | ---- | ३,०००/- | १६,१७,०००/- |
| | एकूण | १२५७ | ---- | ---- | ५५,७५,०००/- |

**परिशिष्ट “ ब ”**

| अ.क्र. | दर्जा | संख्या | आकारावयाचे वार्षिक सेवाशुल्क र.रु. | मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | मंगल कार्यालये | ४९ | १०,०००/- | ४,९०,०००/- |
| २ | शॉपिंग मॉल, मेगा मार्ट | ०२ | १५,०००/- | ३०,०००/- |
| ३ | फाईव्हस्टार, थ्रीस्टार रिसोर्टस् | ०७ | १२,०००/- | ८४,०००/- |
| ४ | हॉल | ०१ | ५,०००/- | ५,०००/- |
| ५ | सभागृह | ०१ | ५,०००/- | ५,०००/- |
| | एकूण | ६० | ----- | ६,१४,०००/- |

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सद्यस्थितीतील मॉलची यादी

| अ.क्र. | प्रभाग कार्यालय | मॉलचे नाव | पत्ता |
|---|---|---|---|
| १ | “अ” प्रभाग | स्टार बझार | काळभोरनगर, मुंबई-पुणे रोड |
| | | डी मार्ट | प्राधिकरण, डी.वाय.पाटील, रावेत रोड |
| २ | “ब” प्रभाग | बिग बझार | चिंचवड, मुंबई-पुणे रोड, बीग सिनेमाखाली |
| | | डी मार्ट | चिंचवड, मुंबई-पुणे रोड |
| | | मोअर फॉर यु | मोरवाडी |
| ३ | “क” प्रभाग | मेगा मार्ट | फुगेवाडी, मुंबई-पुणे रोड |
| ४ | “ड” प्रभाग | डी मार्ट | थेरगाव (काळेवाडी) |
| | | मोअर फॉर यु | पिंपरीगांव |
| | | मोअर फॉर यु | विशालनगर, जगताप डेअरी |
| | | मोअर फॉर यु | शिवार चौक, पिंपळे सौदागर |

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :४३ विषय क्रमांक : ७
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – स्थापत्य अ मुख्या.
सुचक : मा.साधना जाधव अनुमोदक : मा.शैलजा शितोळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था१/अ.मु./१२१/२०१३, दि.२०/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड मनपाच्या अ प्रभागात वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे व पोयटा माती भरणे (सुधारित प्रशासकीय मान्यता) कामी र.रु.२२,५३,१८६/- (अक्षरी र.रु. बावीस लाख त्रेपन्न हजार एकशे शहाऐंशी फक्त ) चे खर्चाचे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :४४ विषय क्रमांक : ८
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – प्रशासन
सुचक : मा.नितीन काळजे अनुमोदक : मा.निलेश बारणे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/१०४७/२०१३, दि.०३/०८/२०१३

विषय - श्री. गायकवाड भानुदास पांडूरंग, उपजिल्हाधिकारी यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील नियुक्तीबाबत.

विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :४५ विषय क्रमांक : ९
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – स्थापत्य प्रकल्प
सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा.किरण मोटे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था.प्र./जा/कावि/५४९/२०१३, दि.३१/०७/२०१३

विषय - मुंबई पुणे रस्ता दापोडी ते पिंपरी चौक कर्ब स्टोन, फुटपाथ, रस्ता दुभाजक इ. देखभाल व दुरुस्ती करणे.

विषय क्रमांक ९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :४६ विषय क्रमांक : १०
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – स्थापत्य प्रकल्प
सुचक : मा.नितीन काळजे अनुमोदक : मा.भाऊसाहेब भोईर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था.प्र./जा/कावि/५४८/२०१३, दि.३१/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मुंबई पुणे रस्ता पिंपरी चौक ते भक्ती शक्ती निगडी कर्ब स्टोन, फुटपाथ, रस्ता दुभाजक इ.देखभाल व दुरुस्ती करणेचे र.रु.४४,२७,९६९/- (अक्षरी र.रु.चव्वेचाळीस लाख

सत्तावीस हजार नऊशे एकोणसत्तर फक्त ) पर्यंतचे खर्चाचे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक :४७ विषय क्रमांक : ११
दिनांक : ०६/०९/२०१३ विभाग – पाणीपुरवठा ड प्रभाग
सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.शैलजा शितोळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पापु/ड/७४०/२०१३, दि.१६/०८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपळे सौदागर ते पिंपळे गुरव मिलिटरी हद्द येथील गुरुत्व नलिका शिफ्ट करणे या कामाचे आवश्यकतेनुसार होणा-या अंदाजपत्रकीय र.रु.१,४१,००,०००/- प्रशासकीय मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(जवळकर वैशाली राहुल)
**सभापती**
मा. विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ८४० /२०१३
दिनांक - ०७/०९/२०१३

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.